# स्वयंसेतूतर्फे प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना निवेदन

सर्वसामान्य प्रवाशांना सोईचे व घाईगडबडीच्या वेळेस सहज उपलब्ध होणारे वाहन म्हणजे रिक्षा .परंतु अलिकडे काही रिक्षा चालकांच्या मनमानी तसेच विकृत वागणुकीमुळे रिक्षातून प्रवास करणं धोक्याचं झालंय. असं असल तरीही सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात रिक्षाचा प्रवास हा अगदी अविभाज्य भाग बनलेला आहे.

हा प्रवास प्रवाशांना विशेषतः स्त्रियांना सुरक्षितपणे करता यावा यासाठी स्वयंसेतूतर्फे एक निवेदन प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री विनोदकुमार यांना नुकतेच देण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने रिक्षा वाहन नंबर रिक्षाच्या आतमध्ये ड्रायव्हर सिटच्या मागे ठळकपणे लिहिण्यात यावा अशी सूचना करण्यात आली आहे. ज्यायोगे एखाद्या प्रवाशाला रिक्षा चालकाकडून वाईट अनुभव आल्यास, एखाद्या महिलेवर अतिप्रसंग ओढवल्यास त्या नंबरच्या आधारे रिक्षा चालक शोधून काढणे सहज शक्य होईल. तसेच असा नंबर नसणाऱ्या रिक्षातून प्रवाशांनी प्रवास करूच नये. याची दक्षता सर्वांनीच घेतली पाहिजे. यामुळे चालत्या रिक्षातून उडी टाकून आपला जीव गमावणे यासारख्या गंभीर घटनांना नक्कीच आळा बसू शकेल, असे स्वयंसेतूच्या अध्यक्षा श्रध्दा कळंबटे यांनी अधिकाऱ्यांना पटवून दिले. श्री विनोदकुमार यांनी त्वरीत यावर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासन स्वयंसेतूला दिले. यावेळी संस्थेचे सदस्य राजेंद्र कदम, चंद्रमोहन देसाई, ऋजुता पित्रे, चंद्रकांत कांबळे, मनोज खानविलकर व सचिन सावेकर उपस्थित होते.



स्वयंसेतूतर्फे निवेदन देताना श्री विनोदकुमार, राजेंद्र कदम, ऋजुता पित्रे, श्रध्दा कळंबटे, चंद्रकांत कांबळे, चंद्रमोहन देसाई, सचिन सावेकर व मनोज खानविलकर.